264

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक २१/०२/२०२४

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन आदेश क्र.H.D.-११०२२/१६/२०२३-पोल-१अ दिनांक २० फेब्रुवारी, २०२४.

**विषय** :- नक्षलग्रस्त भागातील पोलीस कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देण्याकरिता अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर, येथे करार पध्दतीने केलेल्या नियुक्तीचे नवीकरण करणेबाबत- श्री. ब्रिगे. संतोष कुमार कुरुप (सेवानिवृत्त)

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. H.D.-११०२२/१६/२०२३-पोल-१अ, दिनांक २० फेब्रुवारी, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०२२०१९०४२५४४२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन आदेशानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, (विशेष कृती), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान,नागपूर.
प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्रे, नागपूर.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प.
पोलीस अधीक्षक, गडचिरोली.
कार्यासन अधिकारी, का.क्र. १ /२१-अ

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके " आस्थापना" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

नक्षलग्रस्त भागातील पोलीस कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देण्याकरिता अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर, येथे करार पद्धतीने केलेल्या नियुक्तीचे नवीकरण करणेबाबत-
श्री. ब्रिगे. संतोष कुमार कुरुप (सेवानिवृत्त)

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

**शासन आदेश क्र. H.D.-11022/16/2023-Pol1A**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई पिन-४०००३२.
दि. २० फेब्रुवारी २०२४.

**संदर्भ:-**
१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७.१२.२०१६.
२) शासन आदेश, गृह विभाग, क्र. रापोसे-२२२२/प्र.क्र.१५८/पोल-१अ, दिनांक १०.०१.२०२३.
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/१/करार पद्धती नियुक्ती/श्री. संतोष कुरुप/४२२/२०१८, दिनांक ०७.१२.२०२३ व पत्र क्र.पोमसं/२१-ए/१९५/अअप्रकें/१३२/२०२१, दिनांक २४.०१.२०२४.

**शासन आदेश.-**

नक्षलग्रस्त भागातील पोलीस कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देण्याकरिता, पुढील तक्त्यातील स्तंभ (१) मध्ये नमूद सेवानिवृत्त लष्करी अधिकारी यांची, स्तंभ (३) मध्ये नमूद कामे पार पाडण्यासाठी, स्तंभ (४) मध्ये निर्दिष्ट कालावधीकरिता, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर, येथे "प्रशिक्षण प्रमुख" म्हणून शासन आदेश, गृह विभाग, क्र. रापोसे-२२२२/प्र.क्र.१५८/पोल-१अ, दिनांक १०.०१.२०२३, द्वारे करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आली होती-

| नाव (१) | नामिकेचा विषय (२) | कामाचे स्वरूप (३) | काम पूर्ण करण्यासाठी अपेक्षित कालावधी (४) |
|---|---|---|---|
| श्री .ब्रिगे .संतोष कुमार कुरुप (सेवानिवृत्त) | नक्षलग्रस्त भागातील पोलीस कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देणे | १) नक्षलग्रस्त भागातील पोलीस कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देणे- *Anti Naxal Basic Commando Course, River Crossing, Jungle Operations, Raid, Ambush, Jungle Survival, L.U.P., R.V., Room Intervention, SADO, CASO, Map Reading, Planning and Briefing, Parachute Drill, Patrolling, Field Craft Lecture, Night Observation, Field Signal, Advance Weapon Handling* इत्यादी प्रशिक्षण देणे. तसेच *U.O.T.C. Course, Small Action Team* व *Basic Commando Course*.<br>२) उक्त प्रशिक्षणाकरिता नियुक्त नामिकेतील इतर चार अधिकाऱ्यांच्या | एक वर्ष |

Scanned with CamScanner

| नाव (१) | नामिकेचा विषय (२) | कामाचे स्वरूप (३) | काम पूर्ण करण्यासाठी अपेक्षित कालावधी (४) |
|---|---|---|---|
| | | तुकडीचे प्रमुख म्हणून काम पाहणे.<br>३) विशेष गुप्तवार्ता सेवा पुरविणे.<br>४) वरील कामांव्यतिरिक्त, आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, हे सोपवतील ती जबाबदारी पार पाडणे. | |

२. श्री. ब्रिगे. संतोष कुमार कुरुप (सेवानिवृत्त) यांचा करार पद्धतीने नियुक्तीचा कालावधी दिनांक १५.०१.२०२४ रोजी संपला. त्यांच्या करार पद्धतीने नियुक्तीस एक वर्ष मुदतवाढ देण्यात यावी, अशी विनंती पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या कार्यालयाने केली आहे.

३. त्या अनुसार, श्री. ब्रिगे. संतोष कुमार कुरुप (सेवानिवृत्त) यांची अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर, येथे, शासन आदेश, गृह विभाग, क्र. रापोसे-२२२२/ प्र.क्र.१५८/ पोल-१अ, दिनांक १०.०१.२०२३, द्वारे, "प्रशिक्षण प्रमुख" म्हणून करार पद्धतीने करण्यात आलेल्या नियुक्तीचे, पुढील अटी व शर्तीच्या अधीन, याद्वारे, एक वर्षाकरिता नवीकरण करण्यात येत आहे-

अटी व शर्ती.

१) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासानाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/ सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/ हक्क नसेल.

२) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

३) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावी.

४) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध *(Conflict of interest)* जाहीर करणे आवश्यक राहील.

५) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/ माहिती व आधारसामग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

४. शा.नि., सा.प्र. विभाग, क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७.१२.२०१६, याच्या परिच्छेद २(इ)(६) यामधील तरतुदीनुसार श्री. ब्रिगे.संतोष कुमार कुरुप (सेवानिवृत्त) यांच्या कामाचा आढावा घेऊन मूल्यमापन करता यावे म्हणून पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी तिमाही अहवाल शासनास सादर करावा.

५. शा.नि., सा.प्र. विभाग, क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७.१२.२०१६, याच्या परिच्छेद ३ मधील तरतूद लक्षात घेता श्री. ब्रिगे.संतोष कुमार कुरुप (सेवानिवृत्त) यांना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.



Scanned with CamScanner

६. श्री. ब्रिगे. संतोष कुमार कुरुप (सेवानिवृत्त) यांना देय मासिक पारिश्रमिकाची शासन निर्णय, सा.प्र. विभाग, क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७.१२.२०१६, यामधील तरतुदीनुसार परिगणना करण्यात यावी.

७. श्री. ब्रिगे. संतोष कुमार कुरुप (सेवानिवृत्त) यांच्या मासिक पारिश्रमिक व भत्त्यांवर होणारा खर्च हा गृह विभाग- मागणी क्रमांक बी-१, २०५५ पोलीस, ००, १०१, गुन्हे अन्वेषण व दक्षता (००) (००)(०४) गुप्तवार्ता विभाग (२०५५०४३५) (अनिवार्य), १३-कार्यालयीन खर्च, या लेखाशीर्षाखाली उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

८. श्री. ब्रिगे. संतोष कुमार कुरुप (सेवानिवृत्त) यांनी शा.नि., सा.प्र. विभाग, क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७.१२.२०१६, याच्या परिच्छेद २(आ)(४) यामधील तरतुदींनुसार करार पद्धतीने सेवेकरिता रुजू होण्यापूर्वी "प्रशिक्षण प्रमुख" या पदावर काम करण्यास तयार असल्याबाबत व नियुक्तीकरिता विहित केलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे बंधपत्र/हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

९. हा शासन आदेश, शासन निर्णय, सा.प्र. विभाग, क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ अन्वये प्रशासनिक विभाग म्हणून गृह विभागास प्राप्त अधिकारांचा वापर करुन सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

१०. हा शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०२२०१९०४२५४४२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MRUNAL KRISHNA SAWANT

Digitally signed by MRUNAL KRISHNA SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=0cb0d6ece0ccae8c84500c20573f214867456b72833559abe295a3addc1547c5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=410C5F7970E99BA8F8E7899E41A3E5C504381ED982CD86DE7B0B97C6881E3432, cn=MRUNAL KRISHNA SAWANT
Date: 2024.02.20 19:14:11 +05'30'

(मृणाल कृष्णा सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) विशेष पोलीस महासंचालक, नक्षलविरोधी कारवाई, नागपूर.
४) प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर.
५) श्री. ब्रिगे. संतोष कुमार कुरूप (सेवानिवृत्त) *[पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्यामार्फत]*

प्रत:

१) महालेखापाल (लेखा व हकदारी/ लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
२) अपर पोलीस महासंचालक, विशेष कृती, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, मुक्काम- नागपूर.
४) निवड फाईल, पोल-१अ.



Scanned with CamScanner